# दैनिक महावृत्त

E-Mail:dainikmhavratt@gmail.com

संपादक-अशोक हनवते.मो-9421094991,7264079990

लातूर वर्ष ५ वे अंक ४४ रविवार दि.१७ ऑगस्ट २०२५ पृष्ठे ४ स्वागत मूल्य २ रू.







## लाल किल्ल्यावर राहुल गांधी आणि खर्गे अनुउपस्थित, काँग्रेसने दिले स्पष्टीकरण, म्हणाले 'परंपरा मोडली'

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी ७९व्या स्वातंत्र्य दिनी सलग १२व्यांदा तिरंगा फडकावला. इंदिरा गांधी यांना मागे टाकत सर्वाधिक वेळा तिरंगा फडकावणारे मोदी दुसरे पंतप्रधान ठरले आहेत. तसेच आतापर्यंतच्या त्यांच्या लाल किल्ल्यावरील भाषणापैकी सर्वात मोठं १०३ मिनिटं भाषण मोदींनी यावेळी केलं.



शुक्रवारी लाल किल्ल्यावर आयोजित समारंभात जिथे पंतप्रधान मोदी यांनी हा खास विक्रम नोंदवला. तिथे लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेते मल्लिकार्जुन खरगे यांच्या अनुपस्थितीमुळे राजकीय वातावरण तापले.

स्वातंत्र्यदिनाच्या समारंभात 'ही' परंपरा मोडली यावर काँग्रेसकडूनही स्पष्टीकरण देण्यात आले आहे. काँग्रेसचे प्रवक्ते अजय उपाध्याय यांनी एका वृत्तवाहिनीवर आयोजित कार्यक्रमात सांगितले की, गेल्या वर्षी स्वातंत्र्यदिनी राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खरगे यांना शेवटच्या रांगेत बसवण्यात आले होते. पण पूर्वी विरोधी पक्षनेते नेहमीच पहिल्या रांगेत बसत असत. गेल्या ७८ वर्षांत पहिल्यांदाच विरोधी पक्षनेत्याला मागच्या रांगेत बसवण्यात आले होते.

पुढे उपाध्याय म्हणाले की, लोकसभा आणि राज्यसभेतील विरोधी पक्षनेत्याला पंतप्रधान मोदींसोबत पुढच्या रांगेत बसवण्याची संसदीय परंपरा कायम आहे. मात्र, गेल्या स्वातंत्र्यदिनाच्या समारंभात ही परंपरा मोडली गेली. हा केवळ राहुल गांधी आणि मल्लिकार्जुन खर्गे यांचा विरोधी पक्षनेते म्हणून असलेला प्रश्न नाही. हा एका संवैधानिक पदाच्या प्रतिष्ठेचा प्रश्न आहे.

संविधानाच्या प्रतिष्ठेचा भंग होऊ नये म्हणून राहुल गांधी आणि खर्गे यांनी हा निर्णय घेतला. त्यांनी स्वातंत्र्य दिन साजरा केला आणि राष्ट्रध्वजही फडकावला आहे. अशा परिस्थितीत या मुद्द्यावर राजकारण होऊ नये, असे आवाहन देखील त्यांनी केले.

शहजाद पूनावाला यांचा हल्लाबोल लाल किल्ल्यावर आयोजित स्वातंत्र्यदिनाच्या समारंभात विरोधी पक्षनेत्याच्या अनुपस्थितीवर भाजप प्रवक्ते शहजाद पूनावाला म्हणाले की, 'विरोधी पक्षनेतेपद हे एक संवैधानिक पद आहे आणि या कार्यक्रमाला उपस्थित राहणे हे त्यांचे संवैधानिक कर्तव्य आहे.' दरम्यान, खर्गे आणि राहुल गांधी यांनी सोशल मीडियावर स्वातंत्र्यसैनिकांना श्रद्धांजली वाहिली आणि नागरिकांना शुभेच्छा दिल्या होत्या. मात्र लाल किल्ल्यावर उपस्थित राहणे टाळले.

## लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा





लातूर /प्रतिनिधी :- संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज सप्तशतकोत्तर सुवर्ण महोत्सवी (७५०) जयंती वर्ष २०२५ निमित्त संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने दि. १५ ऑगस्ट २०२५ रोजी सायंकाळी ५ ते ७ यावेळेत गंजगोलाई ते लातूर शहर महानगरपालिका, लातूर पर्यंत संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर महाराजांची प्रतिमा/मुर्तीची भव्य पालखी मिरवणूक काढण्यांत आली आहे.

लातूर शहर महानगरपालिकेच्या वतीने बालाजी काशिनाथ शिंदे भांडारपाल यांची नोडल अधिकारी म्हणून नियुक्ती करण्यांत होती. या पालखी मिरवणूक सोहळयात महानगरपालिकेच्या आयुक्त तथा प्रशासक श्रीमती मानसी, अतिरिक्त आयुक्त देविदास जाधव, उपायुक्त डॉ.पंजाबराव खानसोळे, सहाय्यक आयुक्त नंदकिशोर तापडे, क्षेत्रीय अधिकारी, समाधान सुर्यवंशी, बंडू किसवे, संतोष लाडलापूरे,डॉ. शंकर भारती, पर्यावरण अधिकारी सन्मती मेस्त्री, शिक्षणाधिकारी श्वेता नागने, वाहन विभाग प्रमुख, पवन सुरवसे, अतिक्रमण प्रमुख, रवि कांबळे, स्वच्छता विभाग प्रमुख रमाकांत पिडगे, आस्थापना विभाग प्रमुख अभिमन्यू पाटील,अग्निशमन अधिकारी गणेश चौधरी व जनसंपर्क अधिकारी रुक्मानंद वडगावे सर्व अधिकारी कर्मचारी मोठया संख्येने उपस्थित होते.



पालखी सोहळयात एकूण २५ भजनी मंडळानी सहभाग घेतला असून महानगरपालिकेच्या वतीने सर्व भजनी मंडळाचे सन्मानपत्र देऊन आयुक्त श्रीमती मानसी यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला.

## अतिवृष्टीने झालेल्या खरीप पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, बॅरेजेस व सिंचन प्रकल्पांच्या दरवाजाच्या मेंटेनन्ससाठी आकस्मित निधीमधून निधी उपलब्ध करून द्यावा, जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे

### माजी मंत्री आ.अमित देशमुख यांची मागणी





लातूर / प्रतिनिधी:- मागच्या दोन दिवसात लातूर जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या खरीप पिकांच्या नुकसानीचे तातडीने पंचनामे करण्यात यावेत. त्याचबरोबर जिल्ह्यातील कोल्हापुरी बंधारे, बॅरेजेस, सिंचन प्रकल्पाचे गेट्स, आणि कॅनॉल दुरुस्तीसाठी जिल्ह्याच्या अकस्मित निधीमधून निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी माजी मंत्री, आमदार अमित विलासराव देशमुख यांनी, राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा लातूर जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे केले आहे. गुरुवारी रात्री आणि त्यानंतर सलगपणे लातूर जिल्ह्यातील अनेक भागात अतिवृष्टी झाली आहे. शेतातील सकल भागात पाणी साचून खरीप पिकाचे मोठे नुकसान झाले आहे. त्याचबरोबर शेजारील धाराशिव, बीड जिल्ह्यातही मोठा पाऊस झाला असून त्यामुळे तेरणा, मांजरा, तावरजा या नद्यांना पूर आला आहे. परिणामी शेतात पाणी घुसून शेतीचेही नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांना मदत मिळण्याच्या दृष्टीने या सर्व नुकसानीचे तातडीने पंचनामे करावेत, अशी मागणी माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी केली आहे. लातूर नजीक तावरजा नदीवरील भुसनी बॅरेजचे दरवाजे वेळेत उचलले गेले नाहीत त्यामुळे शेतकऱ्यांच्या शेतात पाणी घुसले होते, यासंदर्भातील माहिती मिळाल्यानंतर आमदार अमित देशमुख यांनी शुक्रवारी त्या ठिकाणी जाऊन प्रत्यक्ष पाहणी केली. अधिकाऱ्याशी चर्चा केली असता या बॅरेजच्या दरवाजांचे मेन्टेनन्स वेळेत झाले नसल्याचे लक्षात आले. त्यांनी अधिकची चौकशी केली असता या कामासाठी पुरेसा निधी उपलब्ध नसल्याचे कारण समोर आले आहे, ही बाब माजी मंत्री आमदार अमित विलासराव देशमुख यांनी जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या निदर्शनास आणून दिली आहे. बंधारे , बॅरेजेसचे दरवाजे असोत की, सिंचन प्रकल्पाचे दरवाजे आणि कॅनल असोत याची दुरुस्ती वेळेत आणि तातडीने होणे गरजेची आहे. अन्यथा मोठे नुकसान होऊ शकते. त्यामुळे या मेंटेनन्सच्या कामासाठी जिल्ह्याच्या अकस्मित निधीमधून तातडीने निधी उपलब्ध करून द्यावा, अशी मागणी आमदार अमित देशमुख यांनी पालकमंत्री शिवेंद्रसिंह राजे भोसले यांच्याकडे केली आहे. जिल्ह्याचे पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनीही, हा विषय महत्त्वाचा असल्याने आपण यात तातडीने लक्ष घालू आणि आवश्यक तिथे निधी उपलब्ध करून देऊ असे आश्वासन आमदार अमित देशमुख यांना दिले आहे.

## लोकनेते विलासराव देशमुख यांच्या स्मृतिदिनानिमित्त मनोधैर्य सेवाभावी संस्थेच्या वतीने भोजनदान

दी. १४/०८/२०२५ रो मनोधैर्य सेवाभावी संस्था, लातूरच्या वतीने लोकनेते आदरणीय विलासराव देशमुख साहेब यांच्या १३व्या स्मृतीदिनानिमित्त सं. अध्यक्ष. गायकवाड पवनकुमार यांच्या पुढाकारातून शासकीय विलासराव देशमुख वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालय येथील रुग्णाच्यां नातेवाईकांस भोजनदान करण्यात आले. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून माजी नगरसेवक. अहमदखां पठाण, माजी उपमहापौर. कैलास कांबळे, माजी नगरसेवक. सय्यद इम्रानभाई,लातूर शहर अल्पसंख्यांक कॉंग्रेस चे शहर जिल्हा अध्यक्ष. ऍड. शेख फारुख भाई, लातूर शहर सेवादल कॉंग्रेस चे शहर जिल्हा अध्यक्ष. सुपर्ण जगताप, लातूर शहर कॉंग्रेस प्र. ४चे अध्यक्ष. असिफ बागवान,महाराष्ट्र जनएकता संघटनेचे अध्यक्ष. इरफान शेख,प्र. ५चे अल्पसंख्यांक कॉंग्रेस चे अध्यक्ष. शेख असलम,दिपक गायकवाड, शहाबाजखां पठाण, खाजामिया शेख, इम्रान (अमर) शेख, पाशाभाई शेख, शेख फारुख, खाजापाशा शेख, रोहित काळे, अफान शेख, गोविंद शिंदे, रोहित वडुरले आदी मित्र परिवार उपस्थित होता...!




# दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतिदिनानिमित्त

## पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित मोफत अस्थिरोग शिबिरात २५६ रुग्णांची तपासणी

लातूर : दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या १३ व्या स्मृतीदिनाचे औचित्य साधून येथील पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने गुरुवार, दि. १४ ऑगस्ट २०२५ रोजी आयोजित करण्यात आलेल्या मोफत अस्थिरोग तपासणी शिबिरात एकूण २५६ रुग्णांची तपासणी करण्यात आल्याची माहिती पोद्दार हॉस्पिटलचे संचालक , ज्येष्ठ अस्थिशल्य चिकित्सक डॉ. अशोक पोद्दार यांनी दिली. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने घेण्यात आलेले यावर्षीचे हे १५७ वे मोफत आरोग्य शिबीर होते. यावेळी पोद्दार हॉस्पिटल आणि रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने हेल्थ जनजागृती शिबीरही घेण्यात आले. पोद्दार ऍक्सिडेंट अँड ट्रॉमा केअर सेंटरच्या वतीने सातत्याने अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात येते. लातूरच्या वैद्यकीय क्षेत्रात मोफत आरोग्य शिबिरांची मूळ संकल्पनाच डॉ. अशोक पोद्दार यांच्या पुढाकारातून सुरु झाली आहे, हे विशेष. या शिबिराचे उदघाटन जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहुलकुमार मीना, अप्पर पोलीस अधीक्षक मंगेश चव्हाण यांच्या हस्ते झाले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या प्रतिमेचे मान्यवरांच्या हस्ते पूजन करून दीपप्रज्वलनाने शिबिराचा प्रारंभ करण्यात आला. या प्रसंगी आयएमएचे अध्यक्ष डॉ. अभय कदम, डॉ. चेतन सारडा, डॉ. राजेश दरडे, डॉ. संजय शिवपुजे, डॉ. विश्रांत भारती , रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनचे अध्यक्ष अमोल दाडगे , सचिव पवन मालपाणी, प्रोजेक्ट चेअरमन श्रद्धानंद आपशेट्टी, अमोल बनाळे , पस्तापुरे , माजी उपमहापौर कैलास कांबळे, मंगेश कुलकर्णी, विजय रांदड, जयेश बजाज आदी मान्यवरांची उपस्थिती होती. पोद्दार हॉस्पिटल व रोटरी क्लब ऑफ लातूर मिडटाऊनच्या संयुक्त विद्यमाने आयोजित करण्यात आलेल्या या अस्थिरोग शिबिरात एकूण २५६ रुग्णांची तपासणी व उपचार करण्यात आले. यामध्ये २२५ रुग्णांची हाडांच्या ठिसूळतेची मोफत तपासणी करण्यात आली. ६३ रुग्णांचे एक्सरे काढण्यात आले. ३२ रुग्णांची रक्त तपासणी तर १८० रुग्णांची फिजिओथेरपी करण्यात आली. शिबिरात सहभाग नोंदविलेल्या सर्वच्या सर्व रुग्णांना विविध नामांकित औषध कंपन्यांच्या वैद्यकीय प्रतिनिधींनी मोफत औषधी उपलब्ध करून दिली. या शिबिरात अस्थिरोग, फिजिओथेरपी मोफत करण्यात आली तर रक्त तपासणी, शस्त्रक्रिया शुल्कात ५० टक्के सूट देण्यात आली. हेल्थ इन्शुरन्स जनजागृती शिबिराच्या आयोजनातसाठी आयसीआयसीआय लोंबार्ड, रोटरी कल्लभ ऑफ लातूर मिडटावून व पोद्दार हॉस्पिटल परिवाराने पुढाकार घेतला होता. रुग्णांना यावेळी हेल्थ इन्सुरन्सचे महत्व पटवून देण्यात आले. त्याचप्रमाणे पुण्यस्मरण दिनाचे औचित्य साधून विलासराव देशमुख शासकीय वैद्यकीय महाविद्यालयातील रुग्णांच्या नातेवाईकांसाठी अन्नसेवा उपक्रमही पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने राबविण्यात आला. शासकीय वैद्यकीय महाविद्यालयाचे अधिष्ठाता डॉ. उदय मोहिते पाटील, उप अधिष्ठाता डॉ. उमेश कानडे, काँग्रेसचे जिल्हाध्यक्ष अभय साळुंके आदी मान्यवरांच्या हस्ते व प्रमुख उपस्थितीत ही अन्नसेवा करण्यात आली. पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने आयोजित करण्यात आलेल्या या मोफत अस्थिरोग शिबिरास माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे अध्यक्ष धिरज देशमुख, खासदार डॉ .शिवाजी काळगे यांनीही सदिच्छा भेट दिली. त्यावेळी डॉ. अशोक पोद्दार यांनी त्यांचे स्वागत केले. यावेळी मनोगत व्यक्त करताना धिरज देशमुख यांनी या उपक्रमाचे कौतुक करून डॉ. पोद्दार यांच्या वतीने सातत्याने राबविण्यात येणाऱ्या अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांच्या माध्यमातून गरजू रुग्णांना दर्जेदार आरोग्य सुविधांची उपलब्धी होत असल्याबद्दल समाधान व्यक्त केले. खासदार डॉ. शिवाजी काळगे यांनीही या अभिनव उपक्रमाबद्दल डॉ. पोद्दार व त्यांच्या सर्व सहकाऱ्यांचे कौतुक केले. दिवंगत लोकनेत्याच्या स्मृतिदिनाचे औचित्य साधून लातुरात २०० पेक्षाही अधिक हॉस्पिटल्सच्या माध्यमातून आयोजित केल्या गेलेल्या मोफत आरोग्य शिबिरांचे समन्वयक म्हणून डॉ. अशोक पोद्दार यांनी उत्कृष्ट जबाबदारी पार पाडल्याबद्दलही धिरज देशमुख, खासदार डॉ. काळगे यांनी त्यांचे अभिनंदन केले.

या शिबीर प्रसंगी उपस्थित असलेल्या सर्व मान्यवरांचे पोद्दार हॉस्पिटलचे संचालक डॉ. अशोक पोद्दार यांनी स्वागत केले.






पोद्दार हॉस्पिटलच्या वतीने दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांची जयंती आणि पुण्यतिथी दिनाचे औचित्य साधून नियमितपणे अशा प्रकारच्या शिबिरांचे आयोजन केले जाते. डॉ.अशोक पोद्दार हे आरोग्य तसेच सामाजिक क्षेत्रातही कायम कार्यरत असतात. रुग्णसेवा हीच ईश्वरसेवा हे ब्रीद खऱ्या अर्थाने जोपासण्याचे काम डॉ. अशोक पोद्दार आपल्या सर्व सहकाऱ्यांच्या सहकार्याने सातत्याने करत असतात. डॉ. अशोक पोद्दार यांनी यावेळी बोलताना अशा प्रकारच्या मोफत अस्थिरोग व तपासणी शिबिरांच्या माध्यमातून दरवर्षी हजारो रुग्णांची सेवा करण्याची संधी आपणास मिळते, असे सांगितले. भविष्यातही आपल्या हॉस्पिटलच्या माध्यमातून सातत्याने अशा प्रकारच्या मोफत आरोग्य शिबिरांचे आयोजन करण्यात येणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. ज्या समाजात आपण वावरतो, त्या समाजाचे देणे लागतो. अशा प्रकारच्या शिबीराच्या माध्यमातून आपण समाज ऋणातून अंशतः उतराई होण्याचा प्रामाणिक प्रयत्न करत असल्याचेही त्यांनी नमूद केले. दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांचे लातूरच्या वैद्यकीय क्षेत्राच्या उन्नतीसाठी भरीव योगदान राहिले आहे. या क्षेत्रातील अद्यावत उपचार यंत्रणा, अद्यावत मशिनरी लातूरमध्येही रुग्णसेवेसाठी उपलब्ध असली पाहिजे, या भावनेने त्यांनी सर्व तज्ज्ञ डॉक्टर मंडळींच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहण्याचे काम केल्याची भावना डॉ. पोद्दार यांनी बोलून दाखविली. प्रतिवर्षाप्रमाणे यावेळीही शिबिरादरम्यान दिवंगत लोकनेते विलासराव देशमुख यांच्या गाजलेल्या भाषणांच्या चित्रफिती उपस्थितांसाठी उपलब्ध करून देण्यात आल्या होत्या.

या शिबीरात डॉ. अशोक पोद्दार यांच्यासह पुण्याच्या संचेती हॉस्पिटलचे डॉ. पार्थ शहा, डॉ.इमरान कुरेशी, डॉ. प्रितम , डॉ. मंगेश कुलकर्णी, डॉ. पल्लवी जाधव, डॉ. मुंडकर, डॉ. श्रुती, डॉ. साक्षी सारडा, डॉ. निकिता ब्रिजवासी यांनी रुग्णांची तपासणी व उपचार केले. शिबिराच्या यशस्वीतेसाठी हॉस्पिटलचे प्रशासकीय अधिकारी वसीम शेख यांसह हॉस्पिटलचे सर्व कर्मचारी, मेडिकल रिप्रेझेंटिटीव्ह यांनी परिश्रम घेतले.

# संपादकीय

## चालबाज शाहबाज

पाकिस्तान स्वतंत्र राष्ट्र असले, तरी ते कधीही स्वतःच्या बुद्धीने कारभार करत नाही. ते सुरुवातीपासूनच चीनचे हस्तक म्हणून काम करत आले आहे. भारताच्या विरोधात कारवायांमागे हेच पाठबळ लपून राहिलेले नाही. 'ऑपरेशन सिंदूर'च्या वेळीही त्रेधातिरपीट उडत असताना, चिनी शस्त्रे, ड्रोन आणि क्षेपणास्त्रांची मदत पाकने घेतली. चीन आणि अमेरिकेकडून मदत मिळाली की, पाकिस्तान अधूनमधून फुत्कार सोडतो. पहलगामनंतर भारताने सिंधू पाणीवाटप करार स्थगित करून टाकला. तेव्हापासून तो भारतासमोर पाण्यासाठी सतत गयावया करत होता. 'भारत पाककडून एक थेंबही पाणी हिसकावू शकत नाही. भारताने अशी कोणतीही कृती केली, तर तुम्हाला असा धडा शिकवला जाईल की, तुम्ही नेहमी तो लक्षात ठेवाल,' अशी दर्पोक्ती पाकिस्तानचे पंतप्रधान शाहबाज शरीफ यांनी या पार्श्वभूमीवर केली आहे. वास्तविक, सिंधू पाणीवाटप करार भारताने स्थगित केला, त्यासही तीन महिने उलटून गेले. तरी तो काहीही करू शकलेला नाही. उलट 'ऑपरेशन सिंदूर'नंतर भारतासमोर गुडघे टेकण्याची वेळ पाकवर आली.

पुन्हा कोणतीही आगळीक केल्यास, कल्पनाही केली नसेल, अशी किंमत मोजावी लागेल, असा इशारा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी यापूर्वीच दिला आहे. 'ऑपरेशन सिंदूर' समाप्त झालेले नाही, असेही बजावले आहे. भारतासमोर दोन-चार दिवसांपलीकडे युद्ध खेळण्याची ताकदच पाकिस्तानमध्ये नाही. त्यामुळे पोकळ धमक्या देऊन स्थानिक जनतेला खूश करणे, या एकमेव हेतूनेच शरीफ असली बदमाशी करताहेत. 'ऑपरेशन सिंदूर'दरम्यान पाकिस्तानची ५ लढाऊ विमाने पाडली होती, अशी माहिती भारतीय हवाई दलाचे प्रमुख एअर चीफ मार्शल ए. पी. सिंह यांनी दिली आहे. हवाई दलाच्या ताफ्यात अलीकडेच एस-४०० एअर डिफेन्स सिस्टीम दाखल झाली. यामुळे पाकिस्तानी विमानांना भारताच्या हद्दीत प्रवेश करणे आणि लांब पल्ल्याचे 'ग्लाईड बॉम्ब' फेकणे शक्य होणार नाही. तेव्हा पुन्हा कुरापत काढल्यास, भारताची विमाने पाकिस्तानात बॉम्बफेक करतीलच; पण पाकची विमाने भारतीय हद्दीत आल्यास, ती मातीत मिळवण्याची ताकद भारताकडे आहे, हे पाकिस्ताने लक्षात ठेवले पाहिजे. पाक लष्करप्रमुख असीम मुनीर हेही सतत मुक्ताफळे उधळत असतात. ते दोन महिन्यांत दुसर्यांदा अमेरिकेच्या दौर्यावर गेले.

फ्लोरिडातील ताम्प येथे पाकिस्तानी जनसमुदायासमोर बोलताना ते म्हणाले की, 'आम्ही अण्वस्त्रसज्ज देश आहोत. आमचे अस्तित्व धोक्यात आले, तर आमच्यासोबत निम्म्या जगाला घेऊन उद्ध्वस्त होऊ!' खरे तर, पाकिस्तान अगोदरच आर्थिक आणि राजकीयदृष्ट्या उद्ध्वस्त झालेलाच आहे. तेथील शरीफ सरकार हे लष्कराच्या टेकूवर उभे असून, ज्या पक्षाला (पाकिस्तान तहरीक-ए-इन्साफ (पीटीआय) सर्वाधिक जागा मिळाल्या आहेत, त्या पक्षाला विरोधात बसावे लागले आहे. गेली दोन वर्षे इम्रान खान यांना तुरुंगात डांबले आहे. लष्कराची कठपुतळी बनलेल्या मुस्लिम लीग-नवाज यांच्या अवैध सरकारकडे कोणतेच अधिकार नाहीत. खोटे अधिकार मिळवणे, हाच या सरकारचा एककलमी कार्यक्रम, असे इम्रान यांनी म्हटले आहे. पाकिस्तानात दोषी ठरलेल्या खुनी आणि दहशतवाद्यांनाही माझ्यापेक्षा चांगल्या परिस्थितीत तुरुंगात ठेवण्यात आले आहे, असा आरोप त्यांनी केला आहे.

इम्रान यांनी पंतप्रधान असताना मुनीर यांना 'आयएसआय'च्या प्रमुखपदावरून काढून टाकले होते. त्याचाच बदला आता ते घेत आहेत. शरीफ सरकारविरोधात 'पीटीआय' पक्ष देशव्यापी निदर्शने करत रस्त्यावर उतरला आहे. अशा आतून पोखरलेल्या देशाचा लष्करप्रमुख करत असलेल्या गर्जना हास्यास्पद म्हणाव्या लागतील. अणुहल्ल्याची धमकी देणारा हा बेजबाबदार अण्वस्त्रधारी देश असल्याचे पुन्हा एकदा सिद्ध झाले आहे. त्यावर प्रतिक्रिया देताना, 'आम्ही अण्वस्त्रांच्या धमक्यांना भीक घालत नाही, हे पुन्हा स्पष्ट करतो,' अशा शब्दांत भारताच्या परराष्ट्र मंत्रालयाने मुनीर यांच्या वक्तव्याचा खरपूस समाचार घेतला आहे. जेव्हा जेव्हा अमेरिका पाकिस्तानी लष्कराला पाठिंबा देते, तेव्हा तेव्हा त्यांचे खरे रंग समोर येतात. या देशात लोकशाही अस्तित्वात नसून, लष्कराचेच त्यावर नियंत्रण असल्याचा हा दाखला. अमेरिकेने मुनीर यांना पायघड्या घालून प्रोत्साहन दिल्यामुळे, अंतर्गत धुसफुस वाढणार असून, या देशात बंड अटळ आहे. या परिस्थितीत मुनीर पाकिस्तानचे अध्यक्ष होतील, अशी शक्यता आहे. नागरी सत्तेऐवजी लष्कराच्या हातात अण्वस्त्रांच्या चाव्या आहेत, हेच यातून अधोरेखित होते.

काश्मीर भारताचा अंतर्गत मुद्दा नाही, असे तारेही मुनीर यांनी तोडले असून, पाकिस्तानची अजून जिरली नसल्याचे दिसते! पाकिस्तानमध्ये वाहणारे पाणी थांबवण्यासाठी कुठलेही धरण भारताने बांधले, तर आम्ही ते उद्ध्वस्त करू, अशी धमकी मुनीर यांनी दिली आहे. नुसते तोंड चालवायचेच काम करायचे असल्यामुळे शरीफ यांनीही आता अतिरेकी भाषा वापरली. आपली सत्ता जाते की राहते, या भीतीच्या सावटाखाली ते आहेत; पण पाकिस्तानबाबत, 'गरजेल तो बरसेल काय?' असेच म्हटले पाहिजे. भारत मात्र सदैव कृतीतूनच उत्तर देत असतो, हे लक्षात घेतले पाहिजे. १९७१ च्या युद्धात चीनप्रमाणे अमेरिकाही पाकिस्तानच्या पाठीशी उभी राहिली. या दोन्ही देशांनी पाक सरकारला लष्करी मदतीचे आश्वासन दिले होते. अमेरिकेने भारतावर दबाव आणण्यासाठी सातवे आरमार बंगालच्या उपसागरात तैनात करण्याची तयारी सुरू केली होती.

मात्र, भारताचा आक्रमक पवित्रा पाहून, शेवटी अमेरिकेला मवाळ भूमिका घ्यावी लागली आणि पाकिस्तानचे तत्कालीन अध्यक्ष याह्याखान यांनी जनरल नियाझी यांना शरणागती स्वीकारण्याचे आदेश दिले, हा इतिहास झाला. मात्र, त्यानंतरही अमेरिकेने सातत्याने पाकिस्तानची पाठराखण केली आणि आर्थिक मदतीसह लष्करी मदत केली. त्यामुळे पाकिस्तान नेहमीच अमेरिकेच्या जोरावर उड्या मारत आला आहे. आजही त्यात बदल नाही; पण कोणत्याही देशाची प्रगती स्वत:च्या हिकमतीवर होत असते, हे पाकिस्तानने ध्यानात ठेवायला हवे.

# शक्ती संतुलन

गेल्या दशकभरातील केंद्र सरकारचे परराष्ट्र धोरण हे दीर्घकालीन भू-राजनीतिक गणितांवर आधारल्याचे दिसून आले आहे. भारत सरकारच्या परराष्ट्र धोरणाचा भर हा प्रामुख्याने बहुपर्यायी सिद्धांतावर आधारलेला आहे. त्यामुळेच गेल्या दहा वर्षांत अनेक छोट्या देशांसोबत भारताने आर्थिक-व्यापारी व सांस्कृतिक संबंध प्रस्थापित करण्यासाठी पुढाकार घेतल्याचे दिसून आले आहे. यामुळेच आज थेट जागतिक महासत्ता असणार्या अमेरिकेच्या दबावशाहीपुढे कणखरपणाने उभे राहण्याची क्षमता भारताला प्राप्त झाली. उझबेकिस्तान या मध्य आशियातील देशाकडे वळलेले भारताचे लक्ष हे याचे सूचक म्हणून पाहता येईल. पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि उझबेकिस्तानचे राष्ट्राध्यक्ष शौकत मिर्झियोयेव यांच्यात नुकतीच दूरध्वनीवरून चर्चा पार पडली.




या संवादादरम्यान राष्ट्राध्यक्ष मिर्झियोयेव यांनी भारताच्या ७९व्या स्वातंत्र्यदिनीच्या पूर्वसंध्येला भारताच्या जनतेस हार्दिक शुभेच्छा दिल्या. दोन्ही नेत्यांनी व्यापार, संपर्क, आरोग्य, तंत्रज्ञान आणि जनतेतील परस्परसंबंध यांसारख्या अनेक महत्त्वाच्या क्षेत्रांतील द्विपक्षीय सहकार्याच्या प्रगतीचा आढावा घेतला. याशिवाय, प्रादेशिक व जागतिक विषयांवरही चर्चा झाली आणि भारत-मध्य आशिया यांच्यातील प्राचीन नातेसंबंध अधिक बळकट करण्याची बांधिलकी पुन्हा अधोरेखित करण्यात आली. उझबेकिस्तानसोबतचे भारताचे संबंध वृद्धिंगत करणे म्हणजे एकाच वेळी अनेक लाभ मिळविण्याची संधी ठरणार आहे. अफगाणिस्तानातील अस्थिरता आणि पाकिस्तानच्या अडथळ्यांमुळे भारताला मध्य आशियाशी थेट व्यापारी आणि ऊर्जा मार्ग जोडण्यात अडचणी आल्या आहेत.

अशा वेळी उझबेकिस्तानशी वाढणारे संबंध भारताला इराणच्या चाबहार बंदरावाटे आणि आंतरराष्ट्रीय उत्तर-दक्षिण परिवहन कॉरिडॉरद्वारे (आयएनएसटीसी) नवे मार्ग उघडण्याची संधी देऊ शकतील. चीनच्या 'बेल्ट अँड रोड इनिशिएटिव्ह'च्या वर्चस्वाला संतुलन देणारीही भूमिका आहे. आजवर चीन आणि रशियाच्या प्रभावाखाली राहिलेला उझबेकिस्तान, भारताच्या भागीदारीतून एक पर्यायी कूटनीतिक व आर्थिक आधार शोधू शकतो. अफगाणिस्तानच्या जवळ असलेला हा देश, दहशतवाद-प्रतिबंधक सहकार्यातही महत्त्वाचा भागीदार आहे. भारतासोबतच्या सहकार्याने उझबेकिस्तान दहशतवादी नेटवर्क कमकुवत करण्यास मदत करू शकतो.

याशिवाय शांघाय सहकार्य संघटना या बहुपक्षीय मंचावर उझबेकिस्तानचे पाठबळ मिळाल्यास भारताला मध्य आशियातील राजकीय-सुरक्षा चर्चांना आपल्या प्राधान्यानुसार घडवण्याची ताकद मिळू शकते. द्विपक्षीय सहकार्यातील प्रगतीचे पुनरावलोकन आणि सामरिक भागीदारी पुढे नेण्याचा निर्धार याचे दूरगामी परिणाम संभवतात. भौगोलिकदृष्ट्या पाहिल्यास उझबेकिस्तान मध्य आशियाच्या मध्यवर्ती स्थानी असून अफगाणिस्तान, ताजिकिस्तान, किर्गिस्तान, कझाकिस्तान आणि तुर्कमेनिस्तान या देशांच्या सीमांनी वेढलेला आहे. त्यामुळे तो भारताला मध्य आशिया, रशिया आणि युरोपपर्यंत जोडणारा महत्त्वाचा कनेक्टिव्हिटी नोड ठरू शकतो.

विशेष म्हणजे अफगाणिस्तानशी संलग्न सीमा असणारा हा देश भारताच्या दहशतवादविरोधी धोरणात महत्त्वाची भूमिका निभावू शकतो. उझबेकिस्तान हा सोने, युरेनियम, नैसर्गिक वायू यांसारख्या नैसर्गिक संपत्तीने समृद्ध असणारा देश आहे. हा देश कापसाचा मोठा उत्पादक आहे. भारताला ऊर्जा सुरक्षेसाठी विविध स्रोतांची गरज आहे; त्यामुळे गॅस आणि युरेनियम पुरवठ्यासंबंधी होणारे करार भारतासाठी महत्त्वाचे ठरतात. त्याशिवाय औषधनिर्मिती, माहिती-तंत्रज्ञान, वस्त्रोद्योग आणि मोटारउद्योग या क्षेत्रांत उझबेकिस्तान ही उगवती बाजारपेठ असून तिथे भारतीय उद्योगांना मोठी संधी आहे. चाबहार बंदर आणि आयएनएसटीसी मार्गाने उझबेकिस्तानला जोडणे भारताच्या व्यापाराला गती देऊ शकते.

संरक्षण सहकार्यातही दोन्ही देशांची भागीदारी पाहिल्यास संयुक्त लष्करी सराव, दहशतवादविरोधी प्रशिक्षण, गुप्तचर माहितीची देवाणघेवाण यामुळे ती बहुपदरी आहे. अफगाणिस्तानातील अस्थिरतेच्या पार्श्वभूमीवर हे सहकार्य विभागीय शांततेसाठी आवश्यक आहे. उझबेकिस्तानला भारतीय संरक्षण तंत्रज्ञान व प्रशिक्षणाचा लाभ होऊ शकतो, तर भारताला मध्य आशियाशी कनेक्टिव्हिटीचे लाभ मिळू शकतात. ऐतिहासिकदृष्ट्या विचार करता, संस्कृत व पाली साहित्यातील 'काम्बोज' या उल्लेखात सध्याच्या उझबेकिस्तानच्या काही भागांचा समावेश मानला जातो. 'उत्तरपथ' या प्राचीन व्यापारी मार्गाचा काही भाग उझबेकिस्तानातून जात असे. इतिहासात फरगाना, समरकंद आणि बुखारा ही शहरे भारताला युरोप व चीनशी जोडणारी प्रमुख व्यापारिक केंद्रे होती.

समरकंद आणि बुखारा येथे स्थायिक झालेले भारतीय व्यापारी स्थानिक अर्थव्यवस्थेचा अविभाज्य भाग बनले होते. शतकानुशतकांच्या या संपर्कामुळे स्थापत्यकला, नृत्य, संगीत आणि पाककृतींमध्येही घट्ट सांस्कृतिक नातेसंबंध निर्माण झाले. मिर्झा गालिब आणि अमीर खुसरो यांसारखे महान कवी-कलावंत उझबेक वंशाशी संबंधित होते. उझबेक विद्यार्थ्यांसाठी भारतीय विद्यापीठे, विशेषतः वैद्यकीय आणि तांत्रिक शिक्षण हे आकर्षणाचे केंद्र आहे. सारांश असा की भारत-उझबेकिस्तान संबंध हे फक्त व्यापार किंवा संरक्षणापुरते मर्यादित नसून, ते बहुआयामी असून सर्वच स्तरांवर परिणाम घडवू शकणारे आहेत.

सामरिक दृष्टिकोनातून उझबेकिस्तान हा भारतासाठी एक भूराजकीय 'चौक' असून तेथून दक्षिण आशिया, मध्य आशिया आणि युरोपला जोडणारे अनेक मार्ग जातात. भारताने या देशासोबतच्या भागीदारीचा अधिक सखोल विकास केला, तर ते केवळ द्विपक्षीय फायद्यापुरते मर्यादित राहणार नाही, तर नव्या प्रादेशिक शक्ती-संतुलनाची पायाभरणी करेल.

# स्वातंत्र्याचे मोल

स्वातंत्र्य ही काही काल्पनिक किंवा चमत्कारिक गोष्ट नाही. आपले कर्तव्य नीट व प्रामाणिकपणे करणे हीच देशसेवा आहे, देशप्रेम आहे, साधना आहे, चिंतन आहे, मनन आहे. अशा कर्तव्यदक्ष माणसांमधूनच राष्ट्र घडत असते.



स्वातंत्र्याच्या अमृत महोत्सवानंतर तितक्याच उत्साहाने स्वातंत्र्याच्या शतकाकडे आपली वाटचाल सुरू आहे. या कालखंडात आपण प्रगतीची विविध शिखरे पादाक्रांत केली. शेती, विज्ञान, तंत्रज्ञान, अवकाश, उद्योगधंदे, व्यापार, व्यवस्थापन शास्त्र, कला, मानव्यविद्या ज्ञान शाखा, खेळ, पर्यटन, मनोरंजन, प्रसार माध्यमसह विविध क्षेत्रात नव नवे कीर्तिमान स्थापन केले. कधीकाळी आयातीवर अवलंबून असणारा देश निर्यातदार झाला.

इतकी प्रगती केल्यावर आजच्या एआयच्या जगात वावरताना पारतंत्र्य या संकल्पनेने मन ढवळून निघते. तेव्हा प्रश्न पडतो मुळात आपण पारतंत्र्यात का गेलो? हा खूप मोठा प्रश्न आहे. हजारो मैलांवरून आलेल्या मूठभर इंग्रजांना कोट्यवधीची लोकसंख्या असलेला हा खंडप्राय देश कसा जिंकता आला? उत्तराचा शोध घेताना लक्षात येते आम्ही आपापसात फुटलेलो-तुटलेलो, विविध जाती-धर्मामध्ये गुरफटलेले, स्वार्थांध होतो. विविध अंधश्रद्धांच्या जाळ्यात अडकलेले होतो. डोळे उघडे ठेवून बघितले असता यातून आपली आजही सुटका झाली आहे असे वाटत नाही. त्यातच भर म्हणून की काय सध्याचे बिघडलेले आंतरराष्ट्रीय राजकारण, हेवेदावे. तेव्हा पुन्हा एकदा आत्मपरीक्षण करणे क्रमप्राप्त होऊन बसते.

वैयक्तिक स्वार्थाच्या पलीकडे जाऊन विचार करणार्या विचारवंतांनी, सामाजिक-धार्मिक प्रबोधनाची चळवळ सुरू केली. त्यात महात्मा ज्योतिबा फुले, राजा राममोहन राय, महर्षी धोंडो केशव कर्वे, गोपाळ गणेश आगरकर, विठ्ठल रामजी शिंदे आदी विभूतींनी महनीय कार्य केले. यातूनच १८८५ मध्ये राष्ट्रीय सभेची स्थापना झाली. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, पंडित जवाहरलाल नेहरू, सरदार वल्लभभाई पटेल यांसारख्या अनेक महान दिग्गजांच्या नेतृत्वाखाली स्वातंत्र्यलढा उभा राहून भारताला १५ ऑगस्ट १९४७ रोजी स्वातंत्र्य मिळाले.

यानंतर घटना समितीच्या माध्यमातून आपली राज्यघटना तयार झाली. राज्यघटना तयार झाल्यानंतर ती किती उपयुक्त? या प्रश्नावर उत्तर देताना भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणतात, 'त्या राज्यघटनेचा वापर करणारी माणसे ज्या प्रकारे तिचा वापर करतील त्यानुसार ती आपले यश-अपयश दाखवेल.' याचा अर्थ केंद्रात पंतप्रधान व त्यांचे मंत्रिमंडळ किंवा राज्यात मुख्यमंत्री व त्यांचे मंत्रिमंडळ यांच्यासाठी केवळ राज्यघटना नाही. तुम्ही आम्ही सर्वसामान्य नागरिक घटनेचा वापर कशाप्रकारे करतो, त्यावर घटनेचे यश-अपयश अवलंबून आहे. आपल्याला जर वाईट सवयी जडलेल्या असतील तर त्याला संविधान काय करणार?

उदाहरणार्थ, सार्वजनिक ठिकाणी थुंकणे, घरातील कचरा रस्त्यावर टाकणे, प्लॅस्टिकच्या वापराचा अतिरेक, मतदानाच्या दिवशी सुट्टी म्हणून मतदान न करता फिरायला जाणे, ट्रॅफिकचे नियम न पाळणे, ट्रॅफिक अधिकार्यांनी अडवल्यास पैसे पुढे करणे, आपले स्वतःचे निवडलेले किंवा नेमून दिलेले काम प्रामाणिकपणे न करणे. आपले बरेच कायदे ब्रिटिशकालीन न्याय व्यवस्थेप्रमाणे आजही आहेत. पण ब्रिटिशांच्या कालखंडात कोणत्याही प्रकारच्या गुन्ह्यासाठी ज्या तात्परतेने कारवाई होत होती. तितक्या तात्परतेने आज होताना दिसत नाही. वर्षानुवर्षे कोर्ट केस सुरू राहतात. त्यालाच आपण तारीख पे तारीख असे म्हणतो.

स्वतःचे काम स्वतः न करता वेळ मारून नेणे. कामाची टाळाटाळ करणे. विविध ठिकाणी होत असलेल्या भेसळीवर दुर्लक्ष करणे. टॅक्स प्रामाणिकपणे न भरणे. मी, माझे कुटुंब व माझा स्वार्थ या पलीकडे विचार न करणे. जातिवाद, जमातवाद, प्रदेशवाद यांना तिलांजली न देणे, भ्रष्टाचार हाच शिष्टाचार समजणे, सजग व जागरूक न राहणे, आजच्या युगात वावरतानाही विज्ञानाची कास न धरता अंधश्रद्धांचा अवडंबर माजविणे. सहिष्णुतेचा स्वीकार न करणे, प्रेरणास्थानांमधून योग्य ती प्रेरणा न घेता विविध मार्गांनी प्रेरणास्थानांचे विभाजन करून समाजात दुही निर्माण करणे किंवा त्याचा उपयोग वैयक्तिक स्वार्थासाठी करणे. आजही आम्ही आमची जात किंवा आमचाच धर्म श्रेष्ठ यापुढे जात नाही. काळाची पावलं ओळखायची नाही असे ठरवून घेतल्याप्रमाणे वागतो.

ज्या देशात छत्रपती शिवरायांनी अठरापगड समाजाला एकत्र करून शून्यातून हिंदवी स्वराज्य निर्माण केले. इतके मोठे प्रेरणास्थान युवकांसमोर असतानाही देशातील युवकांना शून्यातून स्वतःचा उद्योग सुरू करण्याची इच्छा न होता ते नोकरीच्या मागे धावताना दिसतात. अशा सवयी नागरिकांना असतील तर आपल्या समस्या सुटणार नाहीत. याशिवाय खूप महत्त्वाचा प्रश्न म्हणजे, या देशातील सर्व नागरिकांना खरंच स्वातंत्र्याचे मोल समजले आहे का?

स्वातंत्र्य मिळाल्याचे मोल कळणे म्हणजे स्वातंत्र्य मिळेपर्यंत मग ते सशस्त्र क्रांतिकारक असतील किंवा सनदशीर मार्गाने स्वातंत्र्यलढा देणारे त्या सर्वांच्या समर्पण व केलेल्या त्यागाबद्दल आपण कृतज्ञ असले पाहिजे, ज्या वीरांनी आपला संसार सोडून देशाच्या संसारासाठी, कल्याणासाठी, विकासासाठी आपल्या सर्वस्वाचा त्याग व बलिदान केले त्यांना विसरता कामा नये. देशासाठी कलंक ठरेल असे कोणतेही वर्तन मी करणार नाही. स्वातंत्र्य ही काही काल्पनिक किंवा चमत्कारिक गोष्ट नाही. आपले कर्तव्य नीट व प्रामाणिकपणे करणे हीच देशभक्ती आहे, देवभक्ती आहे, देशसेवा आहे, देशप्रेम आहे, साधना आहे, चिंतन आहे, मनन आहे. अशा कर्तव्यदक्ष माणसांमधूनच राष्ट्र घडत असते.

राष्ट्रपिता महात्मा गांधी सांगत, देशाच्या विकासासाठी जो बदल व्हावा असे तुम्हाला वाटते, तो बदल आधी स्वतःमध्ये करा, तर आणि तरच आपलं राष्ट्र, आपला देश, आपली राज्यघटना म्हणजेच आपलं संविधान, आपली लोकशाही, आपले प्रजासत्ताक चिरायू राहील. त्यातूनच आपण सर्व खर्या अर्थाने सुखी, समाधानी व आनंदी होऊ.

# स्वातंत्र्य दिनानिमित्त आयोजित समारंभात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते विविध पुरस्कारांचे वितरण





लातूर :- भारताच्या ७९ व्या स्वातंत्र्य दिनानिमित्त मुख्य शासकीय ध्वजारोहण समारंभ जिल्हाधिकारी कार्यालयाच्या प्रांगणात झाला. याप्रसंगी पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. तसेच यावेळी विविध पुरस्कारांचे पालकमंत्र्यांच्या हस्ते वितरण करण्यात आले. जिल्हाधिकारी वर्षा ठाकूर-घुगे, पोलीस अधीक्षक अमोल तांबे, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी राहूलकुमार मीना, लातूर शहर महानगरपालिका आयुक्त श्रीमती मानसी यांची यावेळी प्रमुख उपस्थिती होती. पोलीस दलामध्ये सहायक पोलीस निरीक्षक प्रवीण राठोड, पोलीस उपनिरीक्षक अजय पाटील, पोलीस नाईक महादेव क्षीरसागर यांना विशेष सेवा पदकाने सन्मानित करण्यात आले. लातूर शहर महानगरपालिकेचे उपायुक्त डॉ. पंजाब खानसोळे यांना विकासरत्न पुरस्कार मिळाल्याबद्दल सन्मानित करण्यात आले. तसेच अवयव दान करणाऱ्या व्यक्तींच्या नातेवाईकांचाही यावेळी सन्मान करण्यात आला. यामध्ये स्व. किरण सुनील लोभे यांची आई श्रीमती लता लोभे, भाऊ विकास लोभे आणि स्व. सिंधुताई तळवार यांची मुलगी वर्षा कोळी (तळवार) यांचा पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम २००५ अंतर्गत विहीत कालावधीत सेवा पुरविल्याबद्दल मुरुड ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक यांचा, तर पंचायत प्रगती निर्देशांकाबाबत निवळी ग्रामपंचायतीचे सरपंच, ग्रामसेवक आणि वृक्ष लागवडीतील कार्याबद्दल शिरूर अनंतपाळ तालुक्यातील गणेशवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच व ग्रामसेवक यांचा पालकमंत्र्यांच्या हस्ते सन्मानपत्र देवून गौरव करण्यात आला. वृक्ष लागवडीतील उत्कृष्ट कार्याबद्दल जिल्हा उद्योग केंद्राचे महाव्यवस्थापक प्रवीण खडके यांचा प्रशस्तीपत्र देवून गौरव करण्यात आला.

१०० दिवसांच्या कार्यालयीन सुधारणा मोहिमेच्या दुसऱ्या टप्प्यात विभागीय कार्यालय गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकाविलेले इतर मागास बहुजन कल्याण विभाग प्रादेशिक उपसंचालक कार्यालय, द्वितीय क्रमांक पटकाविलेले पशुसंवर्धन सहआयुक्त कार्यालय आणि प्रादेशिक परिवहन कार्यालय, तसेच जिल्हा कार्यालये गटात राज्यात प्रथम क्रमांक पटकाविलेले जिल्हा माहिती कार्यालय, द्वितीय क्रमांक पटकाविलेले पशुसंवर्धन उपायुक्त कार्यालय, सार्वजनिक बांधकाम विभाग कार्यकारी अभियंता कार्यालय, जिल्हा मध्यवर्ती कारागृह अधीक्षक कार्यालय आणि तृतीय क्रमांक पटकाविलेले जिल्हा उद्योग केंद्र यांचा यावेळी पालकमंत्री श्री. भोसले यांच्या हस्ते गौरव करण्यात आला. या मोहिमेत विभागीय स्तरावर उत्कृष्ट कामगिरी केलेल्या १८ विविध शासकीय कार्यालयांचाही यावेळी गौरव करण्यात आला. यामध्ये औसा येथील एकात्मिक बाल विकास सेवा योजना प्रकल्प अधिकारी कार्यालय, खरोळा येथील पशुधन विकास अधिकारी कार्यालय, औसा परिषद कार्यालय, रेणापूर ग्रामीण रुग्णालय, उदगीर उपविभागीय अधिकारी कार्यालय, औसा दुय्यम निबंधक कार्यालय, अहमदपूर तालुका वैद्यकीय अधिकारी कार्यालय, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण लातूर उपविभाग कार्यालय, जळकोट सार्वजनिक बांधकाम उपअभियंता कार्यालय, लातूर उपविभागीय जलसंधारण अधिकारी कार्यालय, अहमदपूर सहायक निबंधक सहकारी संस्था कार्यालय, अहमदपूर उपकोषागार कार्यालय, उदगीर गट शिक्षणाधिकारी कार्यालय, चाकूर तहसील कार्यालय, उदगीर उपविभागीय कृषि अधिकारी कार्यालय, लातूर वन परिक्षेत्र कार्यालय, औसा सार्वजनिक बांधकाम उपअभियंता कार्यालय, महावितरण किल्लारी ग्रामीण उपविभाग कार्यालय आदी कार्यालयांचा समावेश आहे.

राज्य परीक्षा परिषदेमार्फत घेण्यात आलेल्या पूर्व उच्च प्राथमिक शिष्यवृत्ती परीक्षा आणि पूर्व माध्यमिक शिष्यवृत्ती परिक्षेतराज्यस्तरीय गुणवत्ता यादीत स्थान मिळविलेल्या गौरव विकास एकुरके (संत तुकाराम नॅशनल मॉडेल स्कूल, लातूर), श्लोक सुकेश आलापुरे (किलबिल नॅशनल स्कूल, अहमदपूर), श्रुती बालाजी कंगणे (विद्यावर्धिनी विद्यालय, अहमदपूर), अनन्या राजकुमार गायकवाड (ज्ञानप्रकाश बालविकास प्राथमिक शाळा, लातूर), आर्यन मधुकर कलुरे (श्री श्री रविशंकर इंग्लिश प्रायमरी स्कूल, लातूर) आणि सारंग राम खडके (बंकटलाल लाहोटी इंग्लिश हायस्कूल, लातूर) या विद्यार्थ्यांचाही पालकमंत्र्यांच्या हस्ते गौरव करण्यात आला.

# लातूर एमआयटी येथे उत्साहात स्वातंत्र्य दिनानिम्मित आ. रमेशआप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण




लातूर :- भारतीय स्वातंत्र्य दिनाच्या निमित्ताने माईर्स एमआयटी वैद्यकीय शैक्षणीक संकुल, लातूर येथे शुक्रवार १५ ऑगस्ट २०२५ रोजी सकाळी ९.१५ वाजता लातूर एमआयटीचे कार्यकारी संचालक तथा लातूर ग्रामीण विधानसभा मतदार संघाचे आमदार श्री. रमेशअप्पा कराड यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी अनेकांची प्रमुख उपस्थिती होती.

प्रारंभी राष्ट्रपिता महात्मा गांधीजी यांच्या प्रतिमेस आ. रमेशअप्पा कराड यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. त्यानंतर मोठ्या उत्साहाच्या आणि राष्ट्रभक्तीच्या वातावरणात ध्वजारोहण करण्यात आले. याप्रसंगी लातूर एमआयटीचे परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड, वैद्यकीय महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एन. पी. जमादार, उपअधिष्ठाता डॉ. बी. एस. नागोबा, प्रशासकीय व शैक्षणिक संचालिका डॉ. सरिता मंत्री, शैक्षणिक संचालक डॉ. चंद्रकांत शिरोळे यांच्यासह अनेक मान्यवरांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी एमआयटी परिसर समन्वयक पृथ्वीराज कराड यांच्या हस्ते धन्वंतरी वैद्यकीय महाविद्यालय कर्मचारी पतसंस्थेच्या वतीने सभासद कर्मचाऱ्यांच्या नव्वद टक्केहून अधिक गुण प्राप्त करणाऱ्या गुणवंत पाल्यांचा विविध पारितोषिके देऊन सत्कार करण्यात आले. त्याचबरोबर रुग्णालय कक्षात उत्कृष्ट काम केल्याबद्दल परिचारिका श्रीमती आशा सोनवळे, मीरा बजगुडे आणि त्यांच्या सहकाऱ्यांचा सत्कार करण्यात आला. तसेच उत्कृष्ट कर्मचारी अध्यापक डॉ भागवत शेळके, ग्रंथपाल चाफेकर यांचाही यथोचित सत्कार करून गौरव करण्यात आला.

याप्रसंगी नर्सींग महाविद्यालयाचे प्राचार्य सरवननसेना, दंत महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. यतीश जोशी, उपप्राचार्य डॉ अमोल डोईफोडे, रूगणालय अधीक्षक डॉ. एकनाथ माले, डॉ. अरुणकुमार राव, डॉ. विद्या कांदे, डॉ. चंद्रकला पाटील, डॉ. पठाण, डॉ. बी. एस. वारद, डॉ. मुकुंद भिसे, डॉ. कस्तुरे, डॉ चंद्रकांत चाटे, डॉ. पठाण, डॉ तोष्णीवाल, डॉ. शैला बांगड, डॉ. आशा पिचारे, डॉ. क्रांती केंद्रे, डॉ. क्रांती पाटील, डॉ. कुलकर्णी मुख्य प्रशासकीय अधिकारी सचिन मुंडे, प्रशासकीय अधिकारी मधुकर गुट्टे, श्रीपती मुंडे यांच्यासह एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालय व यशवंतराव चव्हाण ग्रामीण रुग्णालय, एमआयडीएसआर दंत महाविद्यालय, फार्मसी महाविद्यालय, फिजीओथेरपी महाविद्यालय व नर्सिंग महाविद्यालयातील विभाग प्रमुख, प्राध्यापक, डॉक्टर, विद्यार्थी, पालक व नागरीक ध्वजारोहण कार्यक्रमासाठी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# माजी मंत्री आमदार अमित देशमुख यांच्याकडून विलास बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांच्या कुटुंबीयांचे सांत्वन



लातूर प्रतिनिधी:- विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांचे वडील आदर्श शिक्षक विश्वंभर पुरी यांचे नुकतेच निधन झाले. राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी लातूर शहरातील अग्रसेन भवन, झिंगणआप्पा गल्ली परिसरातील विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे संचालक व्यंकटेश पुरी यांच्या निवासस्थानी भेट देऊन पुरी कुटुंबीयांचे सांत्वन केले आणि त्यांना धीर दिला. यावेळी वैभव पुरी, लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, विलास को-ऑपरेटिव्ह बँकेचे व्हाईस चेअरमन समद पटेल, महेश काळे, विष्णुदास धायगुडे, बिडवे अप्पा, महेश कोळे, अभिषेक पतंगे, अभिजीत इगे आदींसह पुरी कुटुंबीय आणि मित्र परिवार उपस्थित होते.

# श्रम संस्कारातूनच जग उभा राहते. माझं घर हा एक आदर्श प्रकल्प,डॉ. जनार्दन वाघमारे

लातूर-समाजात अनेक लोक आहेत त्यांच्याकडे काहीच नाही परंतु शरीर आहे. शरीर हे श्रम करण्यासाठी आहे. शरीराला श्रम नसेल तर पैशाचा काहीच उपयोग नाही. समाजातील शिक्षणापासून वंचित मुलांसाठीच्या माझं घर प्रकल्पात मुलांवर वेगवेगळे संस्कार दिले जातात यामध्ये श्रम संस्कार अत्यंत महत्त्वाचे आहेत. कारण श्रमातूनच जग उभा राहत असून माझं घर ने एक आदर्श निर्माण केला आहे, असे प्रतिपादन माजी खासदार तथा ज्येष्ठ विचारवंत डॉ. जनार्दन वाघमारे यांनी केले. माझं घर प्रकल्पातील मुलांच्या श्रमातून उभारलेल्या सावित्रीमाई फुले मुलींच्या वस्तीग्रहाचे उद्घाटन शुक्रवारी सायंकाळी माजी खासदार डॉ. जनार्दन वाघमारे यांच्या हस्ते झाले. याप्रसंगी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी श्री.सुर्यकांत वैद्य काका होते. पुढे बोलताना डॉ. वाघमारे म्हणाले की माझं घर मध्ये ज्यांना कोणी नाही, तसेच आधाराची गरज असलेल्या वाड्या-तांड्यावरील मुलांना शिक्षणासोबत संस्कार आणि आधार दिला जातो सर्वसामान्यांच्या डोक्यात न येणारी ही गोष्ट आहे मुलांना जीवनात स्वावलंबी बनवण्यासाठी वेगवेगळी कौशल्य इथे शिकवली जातात. त्यांच्यासाठी माझं घर हीच खरी शाळा आहे. कारण ही संस्कार शाळा आहे. शिक्षण हे माणूस घडविण्यासाठी असते हेच




खरे शिक्षणाचे काम आहे. आज आपण जुन्या काळापेक्षा कितीतरी पुढे आलो आहोत तरीही समाजातील दारिद्र्य संपलेले नाही माणूस पैशाने श्रीमंत आहे किंवा गरीब परंतु या दारिद्र्यापेक्षा विचारांचे दारिद्र्य सर्वात वाईट असते. शिक्षण माणसाला विचार करायला शिकवते. हेच काम माझं घर या प्रकल्पात केले जात आहे. प्रकल्पात मुलांसाठी ग्रंथालय स्थापन केल्याचे कौतुक करत डॉक्टर वाघमारे यांनी मुलांना महापुरुषांचे कर्तृत्ववान माणसांचे व महिलांची जीवन चरित्र वाचायला देण्याची सूचना केली कारण मुलांना यातूनच प्रेरणा मिळते आणि नवीन विचारांचा झरा निर्माण होतो. शिक्षणातून असे झरे निर्माण केले पाहिजेत त्याची त्याच्यातून समाजाला सुजलाम, सुफलाम आपण करू शकतो. असे काम सर्वांनी करावे, असेही डॉ. वाघमारे म्हणाले. या कार्यक्रम प्रसंगी प्रा. विद्याधर कांदे-पाटील, जलतज्ञ राजेंद्र कासार, चंद्रशेखर कत्ते, प्रा. विक्रम कदम उपस्थित होते. माझं घर चे प्रमुख शरद झरे यांनी प्रकल्प उभारणीचा उद्देश तसेच गेली सहा वर्षातील प्रवास आपल्या प्रास्ताविकात मांडला. यावेळी प्रा. विद्याधर कांदे पाटील यांनी ही माझं घर प्रकल्पाच्या अडचणी तसेच प्रकल्पाचा प्रवासाचा स्वानुभव या प्रसंगी कथन केला.

या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी डॉ. गणेश गोमारे, राहुल लोंढे, सौ. संगिता झरे, बबलू धुमाळ, अभिजित सुरवसे, अर्जुन कांबळे, राहुल राठोड, सचिन वलेप, सेवा राठोड, प्रशांत कांबळे, जय चौधरी, आदी नी परिश्रम घेतले.

# धरणे १०० टक्के भरली, इतर धरणांत किती पाणी

गेल्या अनेक दिवसांपासून विश्रांती घेतलेल्या पावसाने पुन्हा हजेरी लावण्यास सुरुवात केली आहे. यामुळे धरणांमध्ये काहीशी वाढ झाल्याचे पाहायला मिळत आहे. आज १६ ऑगस्टपर्यंत राज्यातील धरणांमध्ये किती पाणीसाठा जमा झाला आहे हे पाहुयात....

आज १६ ऑगस्टपर्यंत राज्यातील आढळा, सीना, पांझरा, उजनी, राधानगरी धरण १०० टक्के भरली आहेत. तर बहुतांश धरणे ९० टक्क्यांच्यावर भरली आहेत.

आता विभागनिहाय धरणसाठा पाहिला तर नाशिक विभागातील गंगापूर धरण (Gangapur Dam) ८३.४३ टक्के, दारणा धरण (Jayakwadi Dam) ८२.८२ टक्के, करंजवण धरण ९१.०८ टक्के, गिरणा धरण ६६.८५ टक्के, हतनूर धरण ४२.२७ टक्के, ऊकई धरण ६८.१९ टक्के, भंडारदरा धरण ८९.४५ टक्के तर निळवंडे धरण ८६.४३ टक्क्यांवर आहे.

तसेच मुंबई, कोकण विभागातील धरणांपैकी मोडक सागर धरण ८८.४९ टक्के, तानसा धरण ९८.०८ टक्के, विहार धरण ८७.०० टक्के, भातसा धरण ९१.३६ टक्के, हेटवणे धरण ८९.६९ टक्के, चासकमान धरण ९६८.४० टक्के, पानशेत धरण ८९.८४ टक्के, खडकवासला धरण ५०.६४ टक्के, मुळशी धरण ८३.३४ टक्के भरले आहे.

तसेच मराठवाडा आणि नागपूर विभागातील धरणांपैकी उजनी धरण एकूण १०१.४१ टक्के, कोयना धरण ८५.४४ टक्के, अलमट्टी धरण ९९.४३ टक्के, जायकवाडी धरण ९४.७० टक्के, मांजरा धरण ८२.८७ टक्के, सिद्धेश्वर धरण ८६.६० टक्के, गोसेखुर्द धरण ४३.०३ टक्के, तोतला डोह, ६५.६० टक्के, खडकपूर्ण ८६.५६ टक्के, काटेपूर्णा ६६.५१ टक्के, उर्ध्ववर्धा ६२.४७ टक्के भरले आहे.

# ग्रंथपाल हा ज्ञान आणि वाचन संस्कृतीचा प्रसारक सचिन चाफेकर यांचे मत;

## एमआयडीएसआर दंत महाविद्यालयात राष्ट्रीय ग्रंथपाल दिन साजरा

लातूर :- ग्रंथपालाची भूमिका केवळ पुस्तके जतन करणे नाही तर लोकांना उपलब्ध माहितीशी जोडणे, शैक्षणीक मार्गदर्शन करणे, ज्ञानाचे संवर्धन करुन ते सर्वांना उपलब्ध होईल याची व्यवस्था करण्याचे आहे. ग्रंथपाल हा फक्त पुस्तकाचा रक्षक नसून तो ज्ञानाचा पूल बांधणारा आणि वाचन संस्कृतीचा प्रसारक आहे, असे मत एमआयएमएसआर वैद्यकीय महाविद्यालयाचे ग्रंथपाल श्री सचिन चाफेकर यांनी व्यक्त केले. येथील माईर एमआयडीएसआर दंत महाविद्यालयातील ग्रंथालयाच्या वतीने भारताचे पहिले ग्रंथपाल डॉ. एस. आर. रंगनाथन यांची जयंती व राष्ट्रीय ग्रंथपाल दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात प्रमुख मार्गदर्शक म्हणून ग्रंथपाल श्री सचिन चाफेकर बोलत होते. यावेळी ग्रंथालय समिती अध्यक्ष डॉ. महेश दडपे, माजी अध्यक्ष डॉ. ओम बघेले, ग्रंथालय समितीचे सचिव तथा मुख्य ग्रंथपाल ज्ञानोबा केंद्रे, ग्रंथपाल बलभीम ठाकुर, सौ. अनिता कराड यांची प्रमुख उपस्थिती होती. डॉ. शियाली राममृता रंगनाथन हे एक दूरदर्शी, विद्वान आणि भारतातील ग्रंथालय विज्ञानाचे जनक म्हणून ओळखले जातात.

डॉ. रंगनाथन हे केवळ ग्रंथपाल नव्हते. ते एक अग्रणी होते. ज्यांनी ग्रंथालयांची संकल्पना केवळ पुस्तकांच्या भांडारातून ज्ञानाच्या चैतन्यशील केंद्रांमध्ये रुपांतरित केली असे सांगून यावेळी पुढे बोलताना श्री सचिन चाफेकर म्हणाले की, पुस्तके वापरासाठी आहेत, प्रत्येक वाचकास त्याचे पुस्तक, प्रत्येक ग्रंथासाठी वाचक, वाचकाचा वेळ वाचवा व ग्रंथालय ही एक वाढणारी संस्था आहे हे डॉ. रंगनाथन यांचे ग्रंथालय विज्ञानाचे पाच नियम सांगून ते कालातीत तत्व आहेत जे जगभरातील ग्रंथपाल आणि माहिती व्यावसायिकांना मार्गदर्शन करत राहतात. त्याचबरोबर डॉ. रंगनाथन यांनी कोलन वर्गीकरण प्रणालीची ओळख करुन दिली, भारतातील ग्रंथालय कायद्याचा पाया घातला आणि पुढील पिढ्यांना, ग्रंथालयांना समाज, शिक्षण आणि संस्कृतीची सेवा म्हणून पाहण्याची प्रेरणा दिली. सध्याच्या डिजिटल युगात, जिथे माहिती मुबलक आहे

परंतु अनेकदा विखुरलेली आहे, ग्रंथपालाची भूमिका आणखी महत्त्वाची आहे. आपण माहितीच्या महासागरात नेव्हिगेटर आहोत - योग्य माहिती योग्य वेळी योग्य व्यक्तीपर्यंत पोहोचेल याची खात्री करावी.

# कुरेशी समाज व विविध संघटनांच्या वतीने सोमवारी लातुरात मूक मोर्चाचे आयोजन : अफजल कुरेशी


लातूर : शेतकरी, व्यापारी, कुरेशी यांच्यावर गोरक्षकांच्या माध्यमातून होणाऱ्या अन्याय - अत्याचाराच्या विरोधात कुरेशी समाजाने एक महिन्यापासून पशूंची खरेदी, विक्री , कटाई बंद केली आहे. समाजावर होणाऱ्या अन्यायासंदर्भात मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, मनपा आयुक्त यांना निवेदनेही देण्यात आली आहेत. कुरेशी समाजावर होणाऱ्या या अन्यायाचा निषेध करण्यासाठी सोमवार, दि. १८ ऑगस्ट २०२५ रोजी लातुरात भव्य मोर्चाचे आयोजन करण्यात आले असल्याची माहिती अफजल कुरेशी, उपाध्यक्ष, ऑल इंडिया जमिअतुल कुरेश महाराष्ट्र राज्य यांनी शनिवारी लातुरात पत्रकार परिषदेत बोलताना दिली.

मागच्या काही महिन्यांपासून लातूर जिल्ह्यात शेतकरी, कुरेशी समाज , व्यापारी, पशूंची वाहातून करणारे वाहन चालकांवर काही अतिउत्साही गुंड व तथाकथित गोरक्षक प्रशासकीय व राजकीय यंत्रणेच्या मदतीने अन्याय , अत्याचार करत आहेत. त्यामुळे कुरेशी समाजाने दि. २२ जुलै २०२५ पासून पशूंची खरेदी - विक्री, मांस विक्री जिल्हा व राज्यव्यापी बेमुदत बंद केली असा;याचे अफजल कुरेशी यांनी यावेळी बोलताना सांगितले. पशूंची वाहतूक करण्यासाठी परवाना नाही, पशूंचे फिटनेस प्रमाणपत्रच नाही अशा विविध कारणांवरून तथाकथित गावगुंडांकडून पशूंची होणारी वाहतूक अडवून प्रशासनाला हाताशी धरून पशु ताब्यात घेण्याचे प्रकार घडत आहेत. केवळ एवढेच नव्हे तर प्रशासनाच्या ताब्यात देण्यात आलेले हे पशु पुन्हा जनावरांच्या बाजारात विक्रीसाठी घेऊन जात असल्याचा प्रकारही घडत आहे. कुरेशी समाजाचा पारंपरिक व्यवसायच मांस विक्रीचा आहे. तरीही हा व्यवसाय करत असताना गोमातेचे रक्षण झालेच पाहिजे अशी आपल्या समाजाची भावना आहे. तसेच देशी गाईला राष्ट्रमातेचा दर्जा देण्यात आला पाहिजे,अशीही आपलय समाजाची आग्रही मागणी असल्याचे त्यांनी नमूद केले. त्यामुळे या व्यावसायिकांच्या शासनाकडे तथाकथित गोरक्षकांच्या नावाखाली गावगुंडांकडून होत असलेली जनावरांची वाहतूक अडविणे, कायदा हातात घेऊन लूटमार करणे, मारहाण करणे, मॉब लिचिंगद्वारे हत्या करणे आदी प्रकरणात कठोरात कठोर कार्यवाही करून प्रतिबंध करणे, सर्व गोशाळेंची उच्च स्तरीय चौकशी करणे, मुस्लिम खाटीक आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करणे, जनावरांच्या वाहतुकीसाठी वाहन कायद्यात बदल करणे, लातूर जिल्ह्यातील तालुका, नगर पालिका, ग्रामपंचायतच्या क्षेत्रात स्लॅटर हाऊसची




निर्मिती करणे, शेतकऱ्याच्या शेतीमालाला योग्य भाव देणे, पोलिसांमार्फत शेतकरी, व्यापारी, कुरेशी, वाहन चालक,यांच्यावर दाखल केलेले गुन्हे तात्काळ परत घ्यावेत, मोबा लीचिंगद्वारे हत्या झालेल्या नागरिकांच्या कुटुंबियांना मोबदला द्यावा आदी मागण्यासाठी सोमवार, दि. १८ ऑगस्ट रोजी लातुरात अण्णाभाऊ साठे चौक ते तहसील कार्यालयापर्यंत मुकमोर्चा काढण्यात येणार आहे. या मोर्चाला वंचित बहुजन आघाडी, स्वाभिमानी शेतकरी संघटनेसह विविध सामाजिक संघटनांनी आपला पाठिंबा दिला असल्याचे अफजल कुरेशी यांनी सांगितले. यावेळी जमीअतुल कुरेशी कमिटी, लातूरचे जिल्हा अध्यक्ष हाजी इब्राहिम कुरेशी, उपाध्यक्ष फय्युम कुरेशी, सचिव अफसर कुरेशी, संविधान सेवा संघाच्या अध्यक्षा एड. शहेजादी शेख, उपाध्यक्ष एड. गोविंद सिरसाठ, स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे विधी आघाडीचेचे अध्यक्ष एड. विजय जाधव, इस्माईल कुरेशी, चांद कुरेशी, शफिक कुरेशी,जावेद कुरेशी यासह मान्यवरांची उपस्थिती होती.

# आज साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त फकिरा ब्रिगेड च्या वतीने जाहीर व्याख्यान





लातूर :– साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे यांच्या १०५ व्या जयंती निमित्त फकिरा ब्रिगेड च्या वतीने १७ ऑगस्ट रोजी भालचंद्र ब्लड बँक सभागृह बस स्टँड जवळ,लातूर या ठिकाणी सकाळी ११ वाजता जाहीर व्याख्यान होणार आहे. विषय अण्णाभाऊ साठे यांचा साहित्य विचार या कार्यक्रमाचे अध्यक्ष : प्राचार्य. डॉ. संजय शिंदे संस्थापक अध्यक्ष, फकिरा ब्रिगेड तथा सदस्य सचिव, साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र, साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन,प्रमुख वक्ते प्रा. डॉ. शरद गायकवाड सदस्य, साहित्यरत्न, लोकशाहीर अण्णा भाऊ साठे चरित्र, साधने, प्रकाशन समिती, महाराष्ट्र शासन तसेच प्रमुख पाहुणे,आ. अभिमन्यू पवार सदस्य, विधानसभा, औसा मतदारसंघ,आमदार. रमेशअप्पा कराड सदस्य, विधानसभा, लातूर ग्रामीण मतदारसंघ, डॉ.सौ. अर्चनाताई पाटील चाकूरकर भाजपा नेत्या, हे उपस्थित राहणार आहेत. तरी या जाहीर व्याख्यानाला उपस्थित रहावे असे आव्हान संयोजक प्रा. राजेंद्र लोदगेकर, संजय विरोळे जिल्हाध्यक्ष फकीरा ब्रिगेड लातूर, संतोष पटनुरे, पांडूरंग मस्के, गोविंद धबडगे, शरद धबडगे, सुदर्शन शिंदे, किशोर हानवते, सुर्यकांत कदम, राजाभाऊ कदम, दिपक उपाडे, किशोर उपाडे, विजय लोंढे, विकास लोंढे, महादेव शिंदे, नामदेव शिंपी, कुमार हजारे, अर्जुन हजारे, विष्णू कसबे, हनमंत मस्के, तानाजी मस्के, गोपाळ मस्के, विशाल मिसाळ, सुरज समुखराव, गणेश हानवते, शरद साठे, अविनाश हनवते, मुकेश लोढे, भालचंद्र शिंदे, मारूती कांबळे, बाबुराव उपाडे, गहिनीनाथ मस्के, ऋषी भडंगे, बाबासाहेब पटनुरे, सतिष शिंदे, राजाभाऊ इचके, संतोष गायकवाड, संपत गायकवाड, गणेश गायकवाड, गणेश वाघमारे, राम गायकवाड, राम उपाडे, रविकांत कुडके, बाळू पटनूरे, मनोज पटनूरे, सुभाष सिरसाठ, गोविंद कुडके, मारुती माने, रमेश कुडके, बाळासाहेब वाघमारे, हिरालाल कांबळे, दगडू कांबळे, हाणमंत मस्के, शिवाजी शिंदे, महादेव मस्के, चंद्रकांत वाघमारे, सिकिन वाघमारे, कृष्णा वाघमारे, सुनिल सरवदे, सत्यवान चव्हाण, गोविंद मस्के, नेताजी मस्के, नागनाथ गवळी, भाऊसाहेब मस्के, संजय गोरे यांनी केले आहे

# रुद्रापूर येथे अंधश्रद्धेला पोलिसांसह कमलाकर जमदडे यांनी दिलेला फटका



बिलोली प्रतिनिधी बिलोली : अंधश्रद्धा व जादूटोणा यांसारख्या समाजात पसरलेल्या चुकीच्या प्रथा मोडीत काढण्यासाठी रुद्रापूर (ता. बिलोली) येथे एक प्रशंसनीय उपक्रम राबविण्यात आला. मारुती कोळा शेळके यांच्या नूतन घरात एका अज्ञात व्यक्तीने हिरव्या कापडात बांधलेला नारळ, विचित्र अक्षरांचा कागद व फोटो ठेवून भीती निर्माण करण्याचा प्रयत्न केला. या प्रकारामुळे गावकऱ्यांमध्ये संभ्रमाचे वातावरण तयार झाले. परंतु, या घटनेला अंधश्रद्धेचा रंग न देता, गावकऱ्यांना श्रद्धा आणि अंधश्रद्धेतील फरक समजावून सांगण्यात आला. मारुती कोळा शेळके, त्यांचा मुलगा व महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समितीचे जिल्हा प्रधान सचिव कमलाकर जमदडे यांनी तात्काळ हा साहित्य बिलोली पोलीस ठाण्यात नेले. येथे पोलीस निरीक्षक अतुल भोसले व सहाय्यक पोलीस निरीक्षक कमल शिंदे यांनी स्वतः उपस्थित राहून नागरिकांना प्रबोधन केले. अशा अंधश्रद्धाळू कृतींना बळी न पडता विज्ञानाचा स्वीकार करून समाजाला योग्य दिशा देणे आवश्यक आहे, असे स्पष्ट मत त्यांनी व्यक्त केले. पोलिसांच्या उपस्थितीत तो नारळ फोडण्यात आला आणि अधिकारी, कर्मचारी व नागरिकांनी एकत्रितपणे त्या नारळाचे सेवन केले. यामुळे अंधश्रद्धेचा प्रभाव नाहीसा झाला व समाजात आत्मविश्वास निर्माण झाला. या उपक्रमातून एक ठाम संदेश देण्यात आला : भीती नाही, विज्ञानाचा स्वीकार करा. अंधश्रद्धा मोडा, समाज जागवा!

# अनधिकृत बांधकामे, रस्त्यावरील अतिक्रमण व ग्रीन बेल्ट वरील अतिक्रमणे महानगरपालिका लातूर यांनी काढण्यात यावे – लोक प्रहार संघटनेची आयुक्त यांच्याकडे मागणी

**अनधिकृत बांधकामे, रस्त्यावरील व ग्रीन बेल्ट वरील अतिक्रमणे बिल्डर माफियांचा लातुरात सुळसुळाट**



लातूर :– अनधिकृत बांधकामे, रस्त्यावरील अतिक्रमण व ग्रीन बेल्ट वरील अतिक्रमणे महानगरपालिका लातूर यांनी काढण्यात यावे अशी मागणी लेखी निवेदनाद्वारे लोक प्रहार संघटनेची आयुक्त यांच्याकडे केली. अनधिकृत बांधकामे, रस्त्यावरील व ग्रीन बेल्ट वरील अतिक्रमणे काढण्यासाठी महापालिकेने कोणतेही ठोस पाऊल उचललेले नाहीत. याकडे प्रशासनाचे दुर्लक्ष दिसत असून फक्त याकडे बघ्याची भूमिका घेत आहे. रातोरात विना परवाना मोकळ्या जागेवर पत्र्याचे शॉपिंग कॉम्प्लेक्स उभे होत आहेत. शहरात मोठमोठी बांधकामे /दुकान कॉम्प्लेक्स / अपार्टमेंट* नियम डावलून बांधकामे करीत आहेत. नगर रचना मनपा विभाग यांचेकडून परवाना एक मजलीचा बांधकामचा घेतात. आणि त्यावर अनेक मजली बांधकाम करतात. पार्किंग ला जागाच सोडत नाहीत. हे सर्व बांधकामे होत असताना मनपातील अधिकारी,रचना विभाग, अग्निशमन विभाग, अतिक्रमण विभाग, मालमत्ता विभाग याकडे दुर्लक्ष करीत आहेत यांचे यात आर्थिक हित आहे का? हे लातूर च्या जनतेला समजून येत आहे . पंकजाताई मुंडे पर्यावरण मंत्री यांना व लातूर मनपा आयुक्त यांना ग्रीन बेल्ट वरील मोठी अतिक्रमण काढून ग्रीन बेल्ट मोकळे करून त्यांचे सुशोभीकरण करून बेकायदेशीर बांधकामे यावर कार्यवाही करावी. तसेच लातूर शहरातील पार्किंग व रहदारीस अडथळा होऊन कोणत्याही दुर्घटनेसाठी मनपा आयुक्त यांनी लातूरच्या जनतेच्या हितासाठी ठोस पावले उचलावीत. लातूर शहर महानगरपालिका, प्रशासन व स्थानिक आमदार, खासदार, लोक प्रतिनिधी यांच्या दुर्लक्ष कारभारामुळे लातूरकरांमध्ये तीव्र नाराजी व्यक्त केली जात आहे. मनपा आणि बिल्डर माफियांचे संगनमत आता जनतेच्या जीवावर बेतू नये , यासाठी तातडीने उपाययोजना आणि जबाबदारी निश्चित करणे गरजेचे आहे. तसेच कमी क्षेत्रफळ असणारे बांधकामे , मध्यम वर्गीय, स्लम एरिया येथील बांधकामे यांचे करात सवलत देऊन त्यांना व्याजदरच लावू नये. अशा सामाजिक विषयावर लोक प्रहार संघटनेचे वतीने मंत्रालयात कार्यालयी व मुख्यमंत्री देवेन्द्रजी फडणवीस ,एकनाथजी शिंदे साहेब उपमुख्यमंत्री ,अजित दादा पवार उपमुख्यमंत्री व पंकजाताई मुंडे पर्यावरण मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले पालकमंत्री लातूर जिल्हा जिल्हाधिकारी लातूर,महानगरपालिका आयुक्त लातूर, यांना निवेदनाच्या प्रति देण्यात आल्या आहेत. वरीलविषयावरलातूरमनपाआयुक्त/उपायुक्तपंजाबरावखानसोळेयांना लोक प्रहार संघटना तर्फे निवेदन देण्यात आले. यावेळी लोक प्रहार संघटना संस्थापक अध्यक्ष अजय सूर्यवंशी व रोहित सोनवणे युवा जिल्हाध्यक्ष लोक प्रहार संघटना, अमोल सुरवसे, महेश सावंत,आकाश जाधव, राहुल राठोड, जयपाल लोखंडे,अवी कदम,बालाजी जाधव, उपस्थित होते.

# ‘हरितोत्सव’ आणि ‘रानभाजी महोत्सव’चे आज गंजगोलाई येथे आयोजन

**वृक्ष लागवडीसाठी मार्गदर्शन, आवश्यक साहित्य एकाच छताखाली उपलब्ध**

लातूर :– लातूर जिल्ह्यात वृक्ष लागवडीला गती देण्यासाठी शासन, प्रशासन, स्वयंसेवी संस्था आणि नागरिक यांच्या सहभागातून प्रयत्न सुरू आहेत. या उपक्रमात सहभागी होऊ इच्छिणाऱ्या नागरिकांना रोपे आणि वृक्ष लागवडीसाठी आवश्यक साहित्य एकाच ठिकाणी उपलब्ध करून देण्यासाठी जिल्हा प्रशासनाने रविवारी (ता. १७) लातूर शहरातील गंजगोलाई परिसरात सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत ‘हरितोत्सव’ या अभिनव उपक्रमाचे सलग दुसऱ्या वर्षी आयोजन केले आहे. याच ठिकाणी यंदा रानभाज्यांची माहिती देण्यासाठी आणि त्यांची विक्री करण्यासाठी ‘रानभाजी महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. लातूरकरांनी या उपक्रमात सहभागी होण्याचे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे. लातूर जिल्ह्यातील वृक्षाच्छादनाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. हे प्रमाण वाढवण्यासाठी वृक्ष लागवड मोहिमेला लोकचळवळीचे स्वरूप देणे आवश्यक आहे. त्यासाठी नागरिकांमध्ये जनजागृती व्हावी, यासाठी जिल्हा प्रशासनाच्या ‘माझं लातूर, हरित लातूर’ अभियानांतर्गत विविध उपक्रम राबवले जात आहेत. याचाच एक भाग म्हणून सलग दुसऱ्या वर्षी ‘हरितोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. या उपक्रमाच्या जनजागृतीसाठी रविवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी ८ वाजता महात्मा गांधी चौक ते गंजगोलाई दरम्यान वृक्षदिंडीचे आयोजन करण्यात आले आहे. या उपक्रमात जिल्हा प्रशासनासह विविध वृक्षप्रेमी संघटना आणि लातूर व्यापारी संघटना सहभागी होणार आहेत. ‘हरितोत्सव’निमित्त गंजगोलाई ते हनुमान मंदिर चौक परिसरात खासगी रोपवाटिकांचे सुमारे ३७ स्टॉल लावले जाणार आहेत. यामध्ये औषधी वनस्पती, शोभिवंत झाडे, परसबागेसाठी योग्य झाडे, फळझाडे आणि फुलझाडांची रोपे, तसेच वृक्षारोपणासाठी आवश्यक सेंद्रिय खते, कुंड्या आणि इतर साहित्य सवलतीच्या दरात उपलब्ध होणार आहे. याशिवाय, शहरातील नागरिकांना घराच्या अंगणात, गच्चीवर किंवा गॅलरीमध्ये लावण्यायोग्य झाडांची माहिती दिली जाणार आहे. तसेच, ग्रामीण भागातील शेतकऱ्यांना शेताच्या बांधावर लावण्यासाठी योग्य फळझाडांच्या निवडीपासून लागवडीपर्यंत मार्गदर्शन केले जाणार आहे. रानभाज्यांची ओळख, महत्त्व आणि पाककृती जाणून घेण्याची संधी आरोग्याच्या दृष्टीने महत्त्वपूर्ण असलेल्या रानभाज्यांचे महत्त्व पटवून देण्यासाठी आणि त्यांच्या विपणन साखळीला चालना देण्यासाठी कृषि तंत्रज्ञान व्यवस्थापन यंत्रणा (आत्मा) मार्फत रविवार, १७ ऑगस्ट रोजी सकाळी ९ वाजता गंजगोलाई येथे ‘रानभाजी महोत्सव’ आयोजित करण्यात आला आहे. या महोत्सवात रानभाज्या आणि रानफळांचे वैशिष्ट्ये, गुणधर्म, आरोग्यासाठी उपयोग, संवर्धन पद्धती आणि त्यांच्या पाककृतींची (रेसिपी) माहिती दिली जाणार आहे. या रानभाज्या आणि रानफळे विक्रीसाठी उपलब्ध असतील. जिल्ह्यातील ज्या शेतकऱ्यांकडे रानभाज्या आणि रानफळे उपलब्ध आहेत, त्यांनी आपले उत्पादन विक्रीसाठी आणावे. तसेच, जिल्ह्यातील नागरिकांनी या महोत्सवात सहभागी होऊन रानभाज्यांची खरेदी करावी, असे आवाहन जिल्हा प्रशासनाने केले आहे.

# संजय गांधी निराधार योजना तालुकास्तरीय समिती रेणापूर अध्यक्षपदी आंबेकर तर लातूरचे अध्यक्ष भिसे







लातूर :– भाजपा नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार योजना समिती जाहीर करण्यात आली असून रेणापूर तालुका अध्यक्षपदी सतीश आंबेकर यांची तर लातूर तालुका बन्सी भिसे यांची नियुक्ती करण्यात आली आहे.

मुख्यमंत्री मा. देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्या नेतृत्वात राज्यात महायुतीचे सरकार सत्तेवर आल्यापासून अनेक जनहिताचे निर्णय घेतले जात आहेत. भाजपाचे नेते तथा लातूर ग्रामीणचे आमदार श्री. रमेशआप्पा कराड यांच्या शिफारशीनुसार राज्याचे सार्वजनिक बांधकाम मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंह राजे भोसले साहेब यांनी रेणापूर आणि लातूर तालुका संजय गांधी निराधार अनुदान योजना समिती जाहीर केली आहे. त्यानुसार मा. जिल्हाधिकारी लातूर यांनी सदरील नियुक्तीचे पत्र नुकतेच संबंधितांना पाठविले आहे.

नव्याने गठीत करण्यात आलेल्या संजय गांधी निराधार योजना समितीत रेणापूर तालुका समिती अध्यक्ष सतीश आंबेकर नरवटवाडी, सदस्य ललिता अरुण कांबळे पानगाव, अनुसया कोंडीराम फड कुंभारी, विठ्ठल काशिनाथ कस्पटे निवाडा, विजय लक्ष्मण चव्हाण रेणापूर, गोविंदराव नानासाहेब देशमुख डिगोळ देशमुख, सदानंद केदारनाथ पिंपळे खरोळा, कुलदीप राजकुमार सूर्यवंशी आरजखेडा, दीपक संदिपान पवार वाला, सुरेश रामराव बुड्डे आनंदवाडी यांची तर लातूर तालुका समिती अध्यक्ष बन्सी भगवानराव भिसे सारसा, सदस्य रुपेश सूर्यकांत काळे भातखेडा, श्रीमती अनिता पांडुरंग बालवाड भातांगळी, श्रीमती श्रुती अविनाश सवई मुरुड, रमेश उद्धव लहाडे रूई, बाबासाहेब साहेबराव भिसे गाधवड, अरविंद फुलचंद पारवे शिराळा, राजकुमार काशिनाथ सुरवसे चिंचोली (ब), विनायक मल्हारी मगर रामेगाव, योगीराज रामराव साखरे भिसेवाघोली यांचा समावेश करण्यात आला आहे.

रेणापूर आणि लातूर या दोन्ही समिती नियुक्त करून निराधारांना आधार देण्याचे काम केल्याबद्दल जिल्ह्याचे पालकमंत्री मा. शिवेंद्रसिंग राजे भोसले भाजप नेते आ. रमेशआप्पा कराड यांचे आभार व्यक्त करून नवनिर्वाचित अध्यक्षासह समिती सदस्यांचे अनेकांनी अभिनंदन केले आहे.

# बौद्धजन पंचायत समिती भोईवाडा कार्यालय येथे ७९ वा स्वातंत्र्यदिन मोठ्या उत्साहात संपन्न



मुंबई :– बौद्धजन पंचायत समिती मुख्य कार्यालय संलग्न शिवडी गटक्रमांक १३ संपूर्ण कार्यकारिणी मंडळ, संलग्न सर्व शाखा यांच्या संयुक्त विद्यमाने प्रजासत्ताक भारत देशाच्या ७९ वा स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून शिवडी गटक्रमांक १३ चे गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे आणि कार्याध्यक्ष संतोष जाधव यांच्या शुभहस्ते ध्वजारोहण करून तमाम भारतीय नागरिकांना स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा देण्यात आल्या. सदर कार्यक्रमाची प्रस्तावना बौद्धाचार्य नरेश सकपाळ गुरुजी यांनी सादर केली तसेच कार्याध्यक्ष संतोष जाधव, कोषाध्यक्ष प्रवीण तांबे, चिटणीस नरेश सकपाळ, अध्यक्ष राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांनी इंग्रज सरकारच्या गुलामीच्या बेड्या तोडण्यासाठी क्रांतिकाऱ्यांनी, महापुरुष्यांनी स्वतःच्या जीवाची बाजी लावून प्रसंगी प्राणांचे बलिदान देऊन इंग्रज सरकारला हद्दपार करून स्वातंत्र्याची ज्योत पेटवली व त्या सर्वांच्या बलिदानातून निर्माण झालेल्या स्वातंत्र्य भारत देशास एकसंघ बनवण्यासाठी त्या भारत देशाचे संविधान लिहून त्यास प्रजासत्ताक भारत घडविण्याचे कार्य डॉ. बाबासाहेब आंबेडकरांनी केले, या प्रजासत्ताक भारत देशाचा आज ७९ वा स्वातंत्र्यदिन आपण साजरा करतोय तेव्हा समाजातील सर्वच स्तरातील सर्वच लोकांनी आपले मतभेद व मनभेद बाजूला सारून एकमेकांशी बंधुभावाचे नाते टिकवून देशात शांती व बंधुता अबाधीत राहण्यासाठी सहकार्य करावे व या स्वातंत्र्यासाठी ज्यांनी ज्यांनी रक्त सांडले त्यांना मानवंदना देऊन त्यांच्या प्रति कृतघ्नता व्यक्त करावी असे नमूद करीत सर्वांना ७९ व्या स्वातंत्र्यदिनाच्या शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रमास बौद्धजन पंचायत समितीच्या शाखा क्र. ५७८ चे चिटणीस व माजी कोषाध्यक्ष अनंत मोहिते, विभागाचे सचिव अजय पवार, सल्लागार नरेंद्र गंगाराम मोहिते, शाखा क्र. ३७२ चे अध्यक्ष मंगेश सुर्वे, शाखा क्र. ३७१ चे खजिनदार विराज नंदराज पवार, ज्ञानेश्वर सकपाळ, मंगेश जाधव सर्वच शाखांचे कार्यकर्ते, सभासद, विभागातील नागरिक, व्यापारी वर्ग, महिला मंडळ आदी मोठ्या संख्येने उपस्थित होते, या सर्वांनी सदर कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी मोलाचे सहकार्य केले, बौद्धजन पंचायत समितीचे सभापती आनंदराज आंबेडकर, कार्याध्यक्ष लक्ष्मण भगत, सरचिटणीस राजेश घाडगे, खजिनदार नागसेन गमरे यांनी दिलेल्या आदेशानुसार शिवडी विभागाच्या वतीने सदर कार्यक्रम यशस्वीपणे पार पाडण्यासाठी सहकार्य करणाऱ्या सर्वांचे व उपस्थितांचे गटप्रमुख राजाभाऊ तथा रामदास धो. गमरे यांनी आभार मानून कार्यक्रमाची सांगता केली.

# भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळा परीसराच्या सुशोभीकरण कामाचे माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ



लातूर प्रतिनिधी :– भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौकातील पुतळा परीसराच्या सुशोभीकरण कामाचे माजी मंत्री, आ. अमित देशमुख यांच्या हस्ते शुभारंभ राज्याचे माजी वैद्यकीय शिक्षण व सांस्कृतिक कार्यमंत्री, लातूर जिल्ह्याचे माजी पालकमंत्री तथा महाराष्ट्र विधिमंडळ काँग्रेस पक्षाचे मुख्य प्रतोद आमदार अमित विलासराव देशमुख यांनी लातूर शहरातील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक येथील भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळा परिसराचे शुशोभीकरण करावे अशा सूचना महानगरपालिका प्रशासनाला पत्र पाठवून केल्या होत्या. शुक्रवार, १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी लातूर शहरातील प.पू.डॉ.बाबासाहेब आंबेडकर चौक येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकरांच्या पुतळा परिसराचे शुशोभीकरण कामाचे त्यांचे हस्ते शुभारंभ करण्यात आला. प्रारंभी आमदार अमित विलासराव देशमुख यांनी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या प्रतिमेला पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादन केले. या प्रसंगी लातूर शहर जिल्हा काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष किरण जाधव, महाराष्ट्र प्रदेश काँग्रेसचे सचिव समद पटेल, चंद्रकांत चिकटे, ॲडव्होकेट आतिश चिकटे, आसिफ बागवान, राज क्षीरसागर, प्रवीण सूर्यवंशी, तबरेज तांबोळी, अब्बू मणियार, युनूस शेख, पिराजी साठे, करीम तांबोळी, शाबास अहमद खान आदिसह काँग्रेस पक्षाचे विविध पदाधिकारी, कार्यकर्ते आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

PRINTED BY MAHESH MOTIRAM RATHOD, OWNED, PUBLISHED & EDITED BY ASHOK NAMDEVRAO HANWATE, PRINTED AT MAYUR PRINTERS, PLOT No. B-28, MIDC, NEAR BUS STAND 03, LATUR, Tq. & DIST. LATUR - 413512 (M.S.) PULISHED AT : KHADAK HANUMAN, MILIND NAGAR, LATUR TQ. & DIST. LATUR - 413512 (M.S.) EDITOR : ASHOK NAMDEVRAO HANWATE